***प्रकरण 9***

# ***शाश्वत विकास उद्दिष्ट-3***

# प्रकरण 9: शाश्वत विकास उद्दिष्ट-3

***जरी राज्याने शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी दूरदर्शिता (व्हिजन) दस्तऐवज तयार केले असले तरी राज्याचा अर्थसंकल्प शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत नव्हता. महाराष्ट्राने माता मृत्यूदर, पाच वर्षांखालील मुलांचा मृत्यूदर, नवजात शिशु मृत्यु दर कमी करणे आणि क्षयरोग्यांचे यशस्वी उपचार यांच्याशी संबंधित शाश्वत विकास उद्दिष्ट-3 अंतर्गत निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य केली आहेत. तथापि, 12 ते 23 महिने वयोगटातील बालकांचे लसीकरण, एकूण प्रसूतीपैकी रुग्णालये/प्रसूतिगृहामधील (संस्थात्मक) प्रसूतीची टक्केवारी, कुशल आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या प्रसूतीची टक्केवारी आदी उद्दिष्टे साध्य करणे अद्याप बाकी होते. तसेच, महाराष्ट्राने या सर्व वर्षांमध्ये अखिल भारतीय शाश्वत विकास उद्दिष्ट-3 गुणांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे.***

## 9.1 प्रस्तावना

2015 मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने वर्ष 2030 पर्यंत जगाने साध्य करावयाची शाश्वत विकास उद्दिष्टे मंजूर केली. शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक, शाश्वत विकास उद्दिष्ट-3 "चांगले आरोग्य आणि कल्याण" हे निरोगी जीवन सुनिश्चित करण्यासाठी आणि सर्वांसाठी कल्याण यासाठी प्रोत्साहन देण्याशी संबंधित आहे.

भारत सरकारने निती आयोगावर[81] शाश्वत विकास उद्दिष्टे 2030 च्या विषयपत्रिकेच्या (अजेंडा) अंमलबजावणीत समन्वय आणि देखरेख ठेवण्याची जबाबदारी सोपविली (सप्टेंबर 2015).

---

81 दिशादर्शक आणि धोरणात्मक या दोन्ही माहिती पुरविण्यासाठी नॅशनल इंस्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया (निती आयोग) हा भारत सरकारचा विचार गट आहे.

नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन हा महाराष्ट्रातील शाश्वत विकास उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी नोडल विभाग होता. तसेच, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाअंतर्गत शाश्वत विकास उद्दिष्ट-3 च्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी शाश्वत विकास उद्दिष्टे-अंमलबजावणी आणि समन्वय केंद्राची स्थापना (डिसेंबर 2020) करण्यात आली.

## 9.2 शाश्वत विकास उद्दिष्ट-3 च्या संदर्भात राज्याची कामगिरी

निती आयोगाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या भारतीय निर्देशक अहवालामध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांची प्रगती मोजणे आणि राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्पर्धात्मकता विकसित करण्याच्या उद्देशाने एक यंत्रणा[82] निश्चित करण्यात आली आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांच्या भारतीय निर्देशक अहवालाच्या निकालांच्या आधारे, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे चार श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे: साधक (अचिव्हर), फ्रंट रनर, परफॉर्मर आणि अस्पायरंट, जिथे 'अचिव्हर' श्रेणी सर्वोच्च स्थानाचे (रँक) प्रतिनिधित्व करते आणि 'अस्पायरंट' श्रेणी सर्वात कमी स्थानाचे (रँक) प्रतिनिधित्व करते.

2018-19, 2019-20 आणि 2020-21 या वर्षांसाठी शाश्वत विकास उद्दिष्टे भारतीय निर्देशक आणि डॅशबोर्ड अहवालात शाश्वत विकास उद्दिष्ट-3 शी संबंधित महाराष्ट्राची कामगिरी **तक्ता 9.1** मध्ये दर्शविली आहे.

[82] निती आयोगाने जारी केल्यानुसार शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक: आधाररेखा (बेसलाईन) अहवाल 2018 (21 डिसेंबर 2018) अस्पायरंट: 0-49; परफॉर्मर: 50-64; फ्रंट रनर: 65-99; अचिव्हर: 100.

**तक्ता 9.1: भारताच्या शाश्वत विकास उद्दिष्ट-3 गुणांच्या तुलनेत महाराष्ट्राचे शाश्वत विकास उद्दिष्ट-3 चे गुण**

| अ. क्र. | अहवाल | भारताचे शाश्वत विकास उद्दिष्टाचे संयुक्त गुण | महाराष्ट्राचे संयुक्त शाश्वत विकास उद्दिष्ट गुण | भारताचे शाश्वत विकास उद्दिष्ट-3 चे गुण | महाराष्ट्राचे शाश्वत विकास उद्दिष्ट-3 चे गुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शाश्वत विकास उद्दिष्टे भारतीय निर्देशक 1.0[83] (2018) | 57 (परफॉर्मर) | 64 (परफॉर्मर) | 52 (परफॉर्मर) | 60 (परफॉर्मर) |
| 2 | शाश्वत विकास उद्दिष्टे भारतीय निर्देशक 2.0[84] (2019-20) | 60 (परफॉर्मर) | 64 (परफॉर्मर) | 61 (परफॉर्मर) | 76 (फ्रंट रनर) |
| 3 | शाश्वत विकास उद्दिष्टे भारतीय निर्देशक 3.0[85] (2020-21) | 66 (फ्रंट रनर) | 70 (फ्रंट रनर) | 74 (फ्रंट रनर) | 83 (फ्रंट रनर) |

**तक्ता 9.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2018-19 ते 2020-2021 या कालावधीत महाराष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्ट-3 गुणांमध्ये सातत्याने सुधारणा दिसून आली आहे. तसेच, महाराष्ट्राने अखिल भारतीय शाश्वत विकास उद्दिष्ट-3 च्या गुणांपेक्षा सर्व वर्षात चांगली कामगिरी केली आहे. राज्यात जिल्हा-निहाय शाश्वत विकास उद्दिष्टे निर्देशक अहवाल तयार केला नसल्याने जिल्हा-निहाय कामगिरीची खात्री करता येऊ शकली नाही.

83 शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 1.0: निर्देशकांची पहिली आवृत्ती म्हणजेच, शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक आधाररेखा (बेसलाइन) अहवाल 2018 (शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 1.0) हा डिसेंबर 2018 मध्ये जारी करण्यात आला होता. सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या 62 निर्देशकांच्या समावेश असलेल्या 13 विकास उद्दिष्टांच्या संचावर (उद्दिष्टे 12, 13, 14 आणि 17, प्रामुख्याने माहितीच्या कमतरतेमुळे वगळून) निर्देशक प्रगतीचा मागोवा घेतो. अहवालानुसार, शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 1.0 मध्ये महाराष्ट्राला 'परफॉर्मर' म्हणून 64 संयुक्त गुण प्राप्त झाले होते.

84 शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 2.0: हा निर्देशकांची दुसरी आवृत्ती आहे जी त्याच्या पहिल्या आवृत्तीवर आधारित आहे. हि डिसेंबर 2019 मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. शाश्वत विकास उद्दिष्ट-17 चा विदा उपलब्ध नाही ह्या कारणास्तव उद्दिष्ट-17 वगळून 100 निर्देशक जे 16 उद्दिष्टांमधील 54 लक्ष्ये अंतर्भूत करून तयार करण्यात आला आहे. अहवालानुसार, एकत्रित शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 2.0 मध्ये महाराष्ट्राला 'परफॉर्मर' म्हणून 64 गुण प्राप्त झाले होते.

85 शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 3.0: शाश्वत विकास उद्दिष्टे भारत निर्देशक 3.0 जून, 2021 मध्ये प्रसिद्ध झाला, ज्यामध्ये महाराष्ट्राने त्यांच्या 2019-20 मधील 64 वरून 2020-21 मध्ये, 70 अशी शाश्वत विकास उद्दिष्टांच्या एकूण गुणात सुधारणा करून त्यांनी त्यांची श्रेणी 'फ्रंट रनर' अशी सुधारली होती.

## 9.3 शाश्वत विकास उद्दिष्टे स्वीकारण्यासाठी महत्त्वाची पाऊले

शाश्वत विकास उद्दिष्टासंबंधी युनिट/सेल सेंटरची स्थापना करणे, विभाग/योजनांचे नकाशन (मॅपिंग) करणे, शाश्वत विकास उद्दिष्टांबाबत व्हिजन/दिशा निर्देश (रोड मॅप) धोरण तयार करणे, शाश्वत विकास उद्दिष्टांशी अंदाजपत्रकाची सांगड घालणे, संनियंत्रण चौकटीची रचना आणि सल्लामसलत/अभिमुखता (ओरिएंटेशन)/प्रशिक्षण अशा सहा टप्प्यांत शाश्वत विकास उद्दिष्टांच्या अंमलबजावणीतील प्रगतीमध्ये खालील गोष्टी उघड झाल्या.

- महाराष्ट्र शासनाने शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी "महाराष्ट्र व्हिजन 2030" हा दिशादर्शिका दस्तऐवज तयार केला आहे.
- विभाग/योजनांचे नकाशन, संनियंत्रण चौकटीची रचना आणि सल्लामसलत/ अभिमुखता (ओरिएंटेशन)/प्रशिक्षण राज्यात केले गेले आहे.
- राज्याचा अर्थसंकल्प शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत नव्हता.

***शिफारस 20: शासनाने राज्याचा आरोग्य अर्थसंकल्प शाश्वत विकास उद्दिष्ट-3 शी सुसंगत करण्याचा विचार करावा.***

## 9.4 शाश्वत विकास उद्दिष्ट-3 अंतर्गत लक्ष्यांची साध्यता

शाश्वत विकास उद्दिष्टांचे राष्ट्रीय स्तरावर संनियंत्रण व विकासाचा माग ठेवण्यात शासनाला सहाय्य करण्याकरीता प्रत्येक शाश्वत विकास उद्दिष्टाकरीता सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रीय निर्देशक चौकट विकसित केली. शाश्वत विकास उद्दिष्ट-3 साठी विकसित केलेल्या राष्ट्रीय निर्देशक चौकटीमध्ये 41 निर्देशक आहेत, जे 2030 पर्यंत साध्य करावयाचे आहेत. महाराष्ट्रात, शाश्वत विकास उद्दिष्ट-3 साठी सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन हा नोडल विभाग आहे तर गृह (परिवहन) विभाग, वित्त विभाग, पर्यावरण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग हे शाश्वत विकास उद्दिष्ट-3 अंतर्गत असलेली लक्ष्ये साध्य करण्यासाठी इतर संबंधित विभाग आहेत. डिसेंबर 2023 पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्ट-3 च्या 41 निर्देशकांसंबधित राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरीय कामगिरी **परिशिष्ट 9.1** मध्ये तपशीलवार दिली आहे आणि राज्यस्तरीय कामगिरी **तक्ता 9.2** मध्ये सारांशित केली आहे.

**तक्ता 9.2: शाश्वत विकास उद्दिष्ट-3 निर्देशकांच्या तुलनेत साध्यता**

| अ.क्र. | तपशील | साध्यता |
|---|---|---|
| **1** | 16 निर्देशक | लक्ष्ये निश्चित केली नाहीत |
| **2** | 25 निर्देशक | लक्ष्ये निश्चित केली |
| **2 ए** | 4 निर्देशक | लक्ष्ये साध्य केली |
| **2 बी** | 11 निर्देशक | लक्ष्ये साध्य केली नाहीत परंतु राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त |
| **2 सी** | 1 निर्देशक | लक्ष्ये साध्य केली नाहीत आणि राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी |
| **2 डी** | 9 निर्देशक | साध्यता उपलब्ध नाहीत |

*स्त्रोत: आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी सादर केलेली माहीत.*

**तक्ता 9.2** असे मध्ये दर्शविल्याप्रमाणे, भारत सरकारने 25 निर्देशकांसठी निश्चित केलेल्या लक्ष्यांपैकी, चार निर्देशकांची (16 टक्के) लक्ष्ये साध्य झाली, 12 निर्देशकांची (48 टक्के) लक्ष्ये साध्य झाली नाहीत तर उर्वरित नऊ निर्देशकांच्या (36 टक्के) साध्यतेचा विदा उपलब्ध नव्हता.

**(सी. एम. साने)**
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I,
महाराष्ट्र, मुंबई

मुंबई,
दिनांक 08 ऑगस्ट 2024

प्रतिस्वाक्षरीत

**(गिरीश चंद्र मुर्मू)**
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

नवी दिल्ली,
दिनांक 21 ऑगस्ट 2024